**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे**
**१७,डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे — ४११ ००१.**
**दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७** **फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७**
**ई मेल आय डी क्र.** dydpune @ gmail .com **वेब साईट-** WWW.dydepune .com

**जाक्र./प्रशिक्षण-५/व्यवस्थापन कोटा प्रवेश/११-१२/** **दिनांक- २२.९.२०११**

**प्रति,**

**प्राचार्य,**
**सर्व बिगर अल्पसंख्यांक/अल्पसंख्यांक,**
**अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित अध्यापक विद्यालये,**
**जिल्हा-पुणे/अहमदनगर/सोलापूर**

**विषय- व्यवस्थापन कोटयातील डी.टी.एड्.प्रवेश सन २०११-१२ च्या मान्यतेबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते की, बिगर अल्पसंख्यांक/अल्पसंख्यांक, अनुदानित/विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांचे सन **२०११-१२** व्यवस्थापन कोटयातील डी.एड्.प्रवेश मान्यतेबाबत **मा.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे- ३०** यांनी प्रसिध्द केलेल्या प्रवेश नियमावली **२०११-१२** मधील नियम क्रमांक- **१६.११** नुसार व्यवस्थापन कोटयातील प्रवेशांचे प्रस्ताव मान्यतेसाठी या कार्यालयाकडे दिनांक-**३०/९/२०११** पूर्वी सादर करण्यात यावेत. जे अध्यापक विदयालय मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अधिन आहेत अशा अध्यापक विदयालयांनी मा.सर्वोच्च न्यायालयांचे अंतिम आदेश येईपर्यत **सन-२०११-१२** साठी प्रवेश करु नयेत.

प्रस्ताव सादर करण्यास झालेल्या विलंबामुळे प्रवेश अमान्य झाल्यास .त्याची जबाबदारी शासन व या कार्यालयावर राहणार नाही. तर ती **संस्था** व **प्राचार्यांवर** राहील याची नोंद घ्यावी. सदरचे प्रस्ताव मान्यता प्राप्त प्राचार्यांच्या स्वाक्षरीनेच सादर करावेत. तसेच ज्या कॉलेजला यावर्षी नवीन मान्यता मिळालेली आहे अशा कॉलेजने **अध्यक्ष/सचिवांच्या** स्वाक्षरीने प्रस्ताव सादर करावेत. याबाबत खालील सूचनांचे सूक्ष्म वाचन करावे.

**(अ) प्रस्ताव खालील कागदपत्रासह क्रमानेच कागदपत्रे जोडून सादर करावीत.**

| अ.क्र. | **प्रस्तावातील कागदपत्रांचा तपशील** |
|---|---|
| १ | प्राचार्यांच्या अथवा सचिवांच्या स्वाक्षरीने जाक्र. व दिनांकासहीत कव्हरींग लेटर |
| २ | प्राचार्य मान्यतेची प्रत (या कार्यालयाची मान्यता अथवा विद्यापीठाची मान्यता) |
| ३ | एन.सी.टी.ई. मान्यता पत्राची प्रत |
| ४ | एस.सी.ई.आर.टी. मान्यता पत्राची प्रत. |
| ५ | अल्पसंख्यांक नोंदणी प्रमाणपत्र. |
| ६ | व्यवस्थापन कोटा वेळापत्रकास प्राचार्य.जि.शि.प्र.सं.कडून घेतलेल्या मान्यता पत्राची प्रत. |
| ७ | जाहिरात दिलेल्या वृत्तपत्रातील जाहिरातीचे पूर्ण पान (फक्त जाहिरातीचे पान जोडावे संपूर्ण वृत्तपत्र जोडू नये) |
| ८ | अर्ज विक्री नोंदवहीची साक्षांकितप्रत (नांव/पत्ता/१२ वी गुण/शाखा/जातसंवर्ग/फॉर्म किंमत/विदयार्थ्याची स्वाक्षरी) |
| ९ | अर्ज स्विकृती नोंदवहीची साक्षांकित प्रत. (नांव/पत्ता/१२ वी गुण/शाखा/जातसंवर्ग/फॉर्म किंमत/विदयार्थ्याची स्वाक्षरी) |
| १० | शाखा / संवर्ग बदलून प्रवेशासाठी अर्ज केला असल्यास त्याची प्रत (शाखा/संवर्ग बदलाचे पत्र) |
| ११ | चेक लिस्टची साक्षांकित प्रत (सर्व विदयार्थ्यांची एकत्रित यादी) |
| १२ | शाखा निहाय व संवर्ग निहाय गुणवत्ता यादी (सोबतच्या नमून्यात) अल्पसंख्यांक कॉलेजने केवळ शाखानिहाय यादी जोडावी. |
| १३ | आर.पी.ए.डी./यु.पी.सी. नोंद वहीची साक्षांकित प्रत |
| १४ | मुलाखत / कागदपत्र पडताळणीचे उपस्थिती पत्रकाची साक्षांकित प्रत **(विद्यार्थ्यांच्या स्वाक्षरीसह)** |
| १५ | शाखा निहाय प्रवेश निवड यादी |
| १६ | **प्रतिज्ञा - पत्र** प्राचार्य व सचिव/अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीचे सादर करावे.**(रु.१००/-चे स्टॅम्प पेपरवर)** |
| १७ | सर्व विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र **प्रपत्र ब** मधील मेरीटप्रमाणेच जोडण्यात यावे व प्रपत्र ब मधील अनुक्रमांक विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्राच्या सुरुवातीस टाकण्यात यावा. (अक्र. **१९** मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्रे जोडण्यात यावीत) **प्रपत्र ब ४ प्रतीमध्ये** |
| १८ | पुणे-**गर्द लाल**,अहमदनगर-**पिवळा**,सोलापूर-**गर्द निळा** याप्रमाणे आपल्या जिल्हयातील रंगानुसार फाईल सादर करावी. |

**पान क्र.२ वर..**

१९. **महत्वाची सूचना :-**

प्रवेश दिलेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे, प्रपत्र ब मधील क्रमांकानुसार खालीलप्रमाणे एकाखाली एक जोडावीत १) प्रवेश अर्ज. **२) इ.१० वी गुणपत्रक** (बोर्ड प्रमाणपत्र जोडू नये) **३) इ.१२ वी गुणपत्रक ४) शाळा सोडल्याचा मूळ दाखला** ५) महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे **जात प्रमाणपत्र. (मुळ दाखला डुप्लीकेट** असल्यास विदयार्थ्यांनी स्वतः केलेले प्रतिज्ञापत्र सादर करण्यात यावे.तसेच शैक्षणिक वर्षात **खंड** पडला असेल तर त्याचे **गॅप प्रतिज्ञापत्र** ते सुध्दा विदयार्थ्यानेच केलेले असावे. **वडिलांचे** अथवा **भावाच्या** नावाने असलेले प्रतिज्ञापत्र चालणार नाही याची नोंद घ्यावी) **६) एस.टी.** उमेदवाराबाबत **जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र** आवश्यक आहे. ७) एन.टी.-क, व्ही.जे.एन.टी./एन.टी.-ड, व इ.मा.व.-संवर्गातील उमेदवारांची जात प्रमाणपत्रे व वैध कालावधीचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्रे ८) संवर्गातील विद्यार्थ्यांस खुल्यासंवर्गातून प्रवेश दिला असल्यास त्याचे लेखी हमीपत्र स्टॅम्पपेपर दयावे. मात्र त्या विद्यार्थ्याचे इ.१२ वीचे गुण ३०० पेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. व त्याबाबत प्रपत्र ब मध्ये प्रवेशित संवर्गाचा रकाना (कॉलम) करण्यात यावा. ९) अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी अल्पसंख्यांक असलेबाबतची कागदपत्रे. व प्रपत्र-ब मध्ये अल्पसंख्यांक व बिगरअल्पसंख्यांकचा रकाना (कॉलम) करण्यात यावा.**१०)** संवर्गनिहाय घटनात्मक व सामाजिक आरक्षण पाळले नसल्यास त्या त्या संवर्गाचे पुरेसे उमेदवार उपलब्ध होणेबाबत केलेल्या सर्व प्रयत्नांचा तपशील **लिखित** स्वरुपात द्यावा.

२२ **अत्यंत महत्वाची सूचना –**

. वरील प्रमाणपत्रापैकी कोणतेही एक प्रमाणपत्र जोडलेले नसल्यास त्या विदयार्थ्याचा प्रवेश तात्काळ अमान्य करण्यात येईल याची **अध्यक्ष/सचिव/प्राचार्य व संबंधित लिपिक,** यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी. व तसे सदर बैठकीस उपस्थित प्राचार्य/लिपिक यांनी ही सूचना **सचिव व अध्यक्ष** यांच्या निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी त्यांची राहील.

२१. सदर अध्यापक विद्यालयाच्या संस्था सचिव व अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने खालील प्रतिज्ञापत्र फाईलसोबत जोडण्यात यावे.

**प्रतिज्ञापत्र**

प्रतिज्ञा पत्र लिहून देणार श्री/श्रीम......................वय- ..........राहणार- .........ता.............जि.........तथा सचिव, (संस्थेचे नांव)प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, सन **२०११-१२** च्या प्रथम वर्ष **डी.टी.एड्.** प्रवेशासाठी व्यवस्थापन कोटयातून प्राप्त प्रवेश अर्जांचा प्रवेश प्रक्रियेसाठी वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व शासननिर्णयांचा/परिपत्रकांचा तसेच प्रथम वर्ष प्रवेश **२०११-१२** च्या माहितीपत्रकातील नियमावलीचा अवलंब करुन प्रवेश प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. सदर फाईलमध्ये प्रवेश प्रक्रियेसंबंधी तपासणीसाठी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे प्रवेश **मान्य/अमान्यते** बाबत देण्यात येणारा निर्णय मला मान्य राहील.

| | | |
|---|---|---|
| **प्राचार्य** | **अध्यक्ष** | **सचिव** |
| **(संबंधित अध्यापक विद्यालय)** | **(संस्थेचा शिक्का)** | **(संस्थेचा शिक्का)** |

२४ . या कार्यालयाने व्यवस्थापन कोटयातील अमान्य केलेले प्रवेशाबाबतची यादी विद्यार्थ्याच्या निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य व संस्थेची राहील. प्रवेश अमान्यतेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास .त्यास संस्था/प्राचार्य, जबाबदार राहतील. तसेच या कार्यालयाने अमान्य केलेल्या प्रवेशाबाबत **मा. संचालक, म.रा.शै.सं.प्र.प.पुणे-३०** यांचेकडे १० दिवसांच्या आंत अपील करता येईल.

२३. महाराष्ट्र राज्या बाहेरील विदयार्थ्यांचा प्रवेश कोणत्याही परिस्थितीमध्ये मान्य केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**पान क्र.३ वर..**

उपरोक्त अक्र. १२ मधील शाखानिहाय **गुणवत्ता यादी** खालील नमून्यातच असावी.

| अक्र | विद्यार्थ्याचे नांव | इ.१० वीचे गुण | इ.१२ वीचे गुण | जात संवर्ग | जात | शाखानिहाय गुणानुक्रम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विज्ञान शाखा | | | |
| १ | | | | | | |
| | | | कला शाखा | | | |
| १ | | | | | | |
| | | | वाणिज्य शाखा | | | |
| १ | | | | | | |

उपरोक्त अक्र. १७ मधील **प्रपत्र ब** खालील नमुन्यात **गुणवत्तेनुसार तसेच शाखानिहाय (विज्ञान,कला,वाणिज्य) याक्रमाने** अे-४ कागदावर **प्राचार्य, सचिव, व अध्यक्ष** यांच्या स्वाक्षरीनेच सादर करावे.(४ **प्रतीमध्ये**)

**प्रपत्र-ब**

**डी.टी.एड. प्रथम वर्ष व्यवस्थापन कोटयातून दिलेल्या प्रवेशांची यादी - सन-२०११-१२**

**अध्यापक विदयालयाचे नांव व पत्ता-** (संपूर्ण नांव व पत्ता)
**माध्यम-**
अल्पसंख्यांक प्रकार - धार्मिक/भाषिक/-(यापैकी एक)
व्यवस्थापन कोटा क्षमता (२०/५०/१०० %)-(यापैकी एक)
एन.सी.टी.ई. कोड नंबर-

अनुदानित/कायम वि.अनु.- (यापैकी एक)
**प्रकार** - अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक-
एकूण प्रवेश क्षमता-
व्यवस्थापन कोटा मंजूर -
एकूण दिलेले प्रत्यक्ष प्रवेश -

| अक्र | विद्यार्थ्याचे नांव | शाखा | इ.१० वी | | इ.१२वी (मेरीट प्रमाणे) | | जात संवर्ग | जात | आवश्यकतेनुसार बदल करावेत उदा.प्रवेशीत संवर्ग/अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक इ. | शि.उ.सं.यांची मान्यता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माध्यम | गुण | माध्यम | गुण | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

प्राचार्य (सही)
नांव
शिक्का

सचिव (सही)
नांव
शिक्का

अध्यक्ष (सही)
नांव
शिक्का

**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१**

**प्रत- : माहितीस्तव सविनय सादर.**
**मा.संचालक,**
**: महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.**

**प्रत- माहितीस्तव व कार्यवाहीस्तव-**
**प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,**
**लोणीकाळभोर,ता.हवेली, जि.पुणे/ ता.संगमनेर,जि. अहमदनगर/वेळापूर ता.माळशिरस-सोलापूर**